# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

**(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)**

**लवाद दावा क्रमांक ४०/२०२१**

विसापुर गृहनिर्माण संस्था विसापुर **---- वादी**

***विरुध्द***

१) गणेश अर्जुन नागवडे व इतर. **---- प्रतिवादी**

## <u>निशाणी-६५ वरील आदेश</u>

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज संस्थे विरुध्द पुरावा नाही झालेला आदेश रद्द बातल करण्याकरिता केला असुन वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी बेकायदेशीर बांधकाम केल्यानंतर संस्थेने निशाणी-३९ ला अर्ज दिला व त्यानंतर अर्ज दुरुस्ती करण्यात आली. वादींनी यापूर्वी निशाणी-३९ ला पुरावा दिलेला आहे. परंतु त्यानंतर अर्जात दुरुस्ती झाल्यामुळे पुरावा देणे आवश्यक होते. परंतु अनावधानाने वादीकडून दुरुस्तीनंतर पुरावा देण्यात आला नाही आणि वादीचा पुरावा बंदचा आदेश पारित करण्यात आला. करिता तो आदेश रद्द करण्याकरिता सदरचा अर्ज.

२) प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अर्जाला उत्तर दाखल करुन निवेदन केले आहे की, संस्थेने अर्जासोबत भानुदास शिंदे यांचा पुरावा जोडलेला आहे. परंतु या साक्षीदाराने निशाणी-४७ ला अगोदर पुरावा दिलेला आहे आणि त्यांचा उलटतपास

देखील झालेला आहे. त्यानंतर वादी तर्फे झालेल्या साक्षीदाराची उलटतपासणीसुध्दा पूर्ण झाली. त्यानंतर वादींनी एक वर्षापर्यंत कोणताही पूरावा दिला नाही किंवा अर्ज दिला नाही. वादी यांना पुरावा देण्याची संधी दिलेली आहे. प्रकरण लांबविण्याच्या हेतूने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३) वादी आणि प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचे वकीलांच्या युक्तिवादाप्रमाणे संस्थेने दाव्यात दुरुस्ती केली आहे त्यामुळे साक्षीदाराला परत पुरावा देता येणार नाही, कारण साक्षीदाराचा निशाणी-४७ कडे पुरावा झालेला आहे. याउलट वादीचे वकीलांचा युक्तिवाद आहे की, संस्थेने निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती केली आहे आणि साक्षीदारांची साक्ष ही दुरुस्ती करण्यापूर्वी झाली आहे. त्यामुळ दुरुस्तीनंतर या साक्षीदाराचे शपथपत्र दाखल केले आहे.

४) दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसुन येते की, संस्थेने निशाणी-३९ अर्ज हा आदेश ३९ नियम २ (अ) दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रतिवादींनी न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे कारवाई करण्याकरिता केला होता. त्यानंतर या अर्जाच्या अनुषंगाने संस्थेने साक्षीदार तपासले. परंतु त्यानंतर निशाणी-३९ मध्ये न्यायालयाच्या निशाणी-५३ वरील आदेशान्वये दुरुस्ती केली. वादी संस्था त्या दुरुस्ती कथनानुसार परत साक्षीदार म्हणून भानुदास ज्ञानदेव शिंदे यांचे शपथपत्र या अर्जासोबत दाखल केले. वादीने निशाणी-३९ अर्जामध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार साक्षीदाराचे शपथपत्र दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे

प्रतिवादींच्या वकीलांनी केलेल्या कथनात कोणतेही तथ्य दिसुन येत नाही. ही बाब खरी आहे की, निशाणी-३९ अर्जान्वये पुरावा घेण्याची संधी वादीला देण्यात आली होती, परंतु वादीने काही साक्षीदारांची साक्ष घेतल्यानंतर निशाणी-३९ दुरुस्तीनुसार साक्षीदाराचे शपथपत्र दाखल न केल्यामुळे पुरावा बंदचा आदेश पारित करण्यात आला. वादीच्या अर्जातील कथनाप्रमाणे अनावधानाने निशाणी-३९ मध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार पुरावा देता आला नाही. वादीने नमुद केलेले कारण लक्षात घेणे योग्य आहे, कारण संस्थेने निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती केली आहे. वादीने या अर्जासोबत साक्षीदाराचे शपथपत्रसुध्दा दाखल केले आहे आणि संस्थेला संधी दिली आहे. प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण प्रतिवादीला वादी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची मुभा आहे.

वरील कारणास्तव वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : ११/०१/२०२४

**(बी.एस.लखोटे)**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय, अहमदनगर.**